# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date – 16 July 2025

Time 7.10 AM to 7.20 AM

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक १६ जुलै २०२५ सकाळी ७.१० मि.**

****

- ग्रुप कॅप्टन शुभांशु शुक्ला यांची अंतराळ मोहीम यशस्वी– भारताच्या गगनयान मोहिमेच्या दिशेनं हे महत्त्वाचं पाऊल–पंतप्रधानांचं प्रतिपादन
- महाराष्ट्र इलेक्ट्रिक वाहन उत्पादन क्षमतेचं सर्वात मोठं राज्य ठरेल – टेस्लाच्या उद्घाटन सोहळ्यात मुख्यमंत्र्यांकडून विश्वास व्यक्त
- छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातल्या सोयगावसह चार उदंचन जलविद्युत प्रकल्पासंदर्भात जलसंपदा विभागाचे सामंजस्य करार
- अनधिकृत कत्तलखान्यांवर तातडीनं कारवाईचे निर्देश देणार–मंत्री उदय सामंत यांची ग्वाही

आणि

- धाराशिव जिल्ह्यात १९ तारखेला प्रशासनाकडून भव्य वृक्ष लागवड अभियानाची घोषणा

****

ॲक्सिओम फोर मोहिमेअंतर्गत आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावर गेलेले भारतीय अंतराळवीर ग्रूप कॅप्टन शुभांशू शुक्ला आणि त्यांचे सहकारी काल पृथ्वीवर सुखरूप परतले. या अंतराळवीरांना घेऊन आलेल्या ड्रॅगन कॅप्सुल या छोट्या अंतराळ यानाने, प्रशांत महासागरात कॅलिफोर्नियाजवळ यशस्वीपणे अवतरण केलं. त्यानंतर लखनौ इथं शुक्ला यांच्या घराजवळ त्यांच्या आईवडिलांसह सर्व नागरिकांनी जल्लोष केला.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शुक्ला यांचं अभिनंदन करत, ही मोहीम म्हणजे भारताच्या गगनयान मोहिमेच्या दिशेनं एक महत्त्वाचं पाऊल असल्याचं म्हटलं आहे.

केंद्रीय विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्री डॉक्टर जितेंद्र सिंह यांनी ग्रूप कॅप्टन शुभांशू शुक्ला आणि त्यांच्या सहकाऱ्यांचं अभिनंदन केलं. हा देशासाठी अभिमानाचा क्षण असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली..

**बाईट – केंद्रीय विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्री डॉक्टर जितेंद्र सिंह**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार तसंच एकनाथ शिंदे यांनीही समाज माध्यमावरच्या संदेशातून शुक्ला यांचं अभिनंदन केलं.

****

महाराष्ट्र देशातलं सर्वात मोठं इलेक्ट्रिक वाहन उत्पादन क्षमता असलेलं राज्य ठरेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. काल मुंबईत टेस्ला एक्सपिरियन्स सेंटरच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. टेस्लाचं जगप्रसिद्ध, "Model Y" यावेळी लॉँच करण्यात करण्यात आलं. राज्य सरकार इलेक्ट्रिक गाड्यांसाठी धोरणात्मक प्रोत्साहन देत असून, भविष्यातल्या ग्रीन मोबिलिटीचा केंद्रबिंदू महाराष्ट्र ठरणार असल्याचं फडणवीस यांनी स्पष्ट केलं. ते म्हणाले..

**बाईट – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

****

उदंचन जलविद्युत प्रकल्प क्षेत्राला सक्षम करण्यासाठी जलसंपदा विभागाने काल चार महत्त्वाचे सामंजस्य करार केले. यामध्ये छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याच्या सोयगाव तालुक्यातल्या प्रकल्पासाठी ग्रीनको एम एच – 01 आय आर ई पी या कंपनीसोबत करार करण्यात आला. या ठिकाणी ही कंपनी सुमारे नऊ हजार सहाशे कोटी रुपयांची गुंतवणूक करेल, त्यातून सुमारे सहा हजार रोजगार निर्मिती होणार आहे.

****

हिंगोली जिल्ह्यात वसमत इथल्या बाळासाहेब ठाकरे हरिद्रा संशोधन केंद्रासाठी मंजूर निधीसह वाढीव निधी टप्प्याटप्प्याने दिला जाईल, असं अर्थ राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांनी सांगितलं. ते काल विधान परिषदेत हेमंत पाटील यांच्या लक्षवेधी सूचनेवर बोलत होते. आगामी अर्थसंकल्पात या प्रकल्पासाठी अधिकाधिक निधी देण्याची ग्वाही जयस्वाल यांनी दिली, ते म्हणाले...

**बाईट – अर्थराज्यमंत्री आशिष जयस्वाल**

****

जलयुक्त शिवार योजनेत मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार होत असल्याचा आरोप सदस्य कैलास पाटील यांनी काल विधानसभेत केला. सरकारी निधीचा राजरोसपणे अपहार होत असल्याचं ते म्हणाले...

**बाईट – आमदार कैलास पाटील**

****

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या प्रदेशाध्यक्ष पदी शशिकांत शिंदे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. काल मुंबईत, पक्षाच्या बैठकीत अध्यक्ष शरद पवार यांनी ही घोषणा केली.

****

पंढरपूर इथं आषाढी यात्रेच्या सोहळ्यानंतर केली जाणारी श्री विठ्ठल आणि रुक्मिणी मातेची प्रक्षाळ पूजा आज होणार आहे. आषाढी यात्रेच्या कालावधीत बंद असलेले काकड आरती, पोशाख, धुपारती, शेजारती इत्यादी राजोपचार, प्रक्षाळपूजेनंतर पुन्हा सुरू होणार असल्याचं, मंदिर व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी सांगितलं.

****

अनधिकृत कत्तलखान्यांवर तातडीनं कारवाईचे निर्देश पोलिसांना देणार असल्याचं, मंत्री उदय सामंत यांनी काल विधान परिषदेत सांगितलं. महानगरपालिकेच्या अधिकृत कत्तलखान्यातच कत्तल करण्यास परवानगी असल्याची माहितीही त्यांनी सभागृहाला दिली.

****

गोवंश हत्या बंदीच्या कायद्याच्या विरोधात बीड जिल्ह्यात शेतकरी आणि कुरेशी समाजाने आंदोलनाचा इशारा दिला आहे. या कायद्यामुळे भाकड जनावरं विक्री करण्यात अडचणी येत असून, हा कायदा फक्त गोरक्षकांचा विचार करून लागू करण्यात आल्याचा आरोप आंदोलक करत असल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

****

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात कन्नड शहराला पाणीपुरवठ्यासंदर्भात अंबाडी योजना तसंच शिवना टाकळी मध्यम प्रकल्प, अशा दोन्ही योजनांचे प्रस्ताव सादर करावेत, असे निर्देश पाणीपुरवठा मंत्री गुलाबराव पाटील यांनी दिले. मंत्रालयात काल यासंदर्भात झालेल्या बैठकीत ते बोलत होते.

****

परभणी जिल्ह्यातल्या पिकांसाठी जायकवाडी धरणातून तत्काळ पाणी सोडण्याचे निर्देश जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिले आहेत. काल विधान भवनात झालेल्या बैठकीत ते बोलत होते. मंत्र्यांच्या निर्देशानुसार, जायकवाडी धरणाच्या डाव्या कालव्यातून माजलगाव धरणामार्फत परभणी जिल्ह्यासाठी पाणी सोडण्यात येणार आहे.

****

धाराशिव जिल्ह्यात येत्या १९ तारखेला भव्य वृक्ष लागवड अभियान राबवलं जाणार आहे. एक पेड मां के नाम तसंच माझी वसुंधरा हरित धाराशिव अभियानात सर्व नागरिकांनी सहभागी होण्याचं आवाहन जिल्हाधिकारी कीर्तिकिरण पूजार यांनी केलं आहे. या अभियानात जिल्हा यंत्रणेचे सर्व विभाग सहभागी होणार असल्याचं जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितलं. ते म्हणाले...

**बाईट – जिल्हाधिकारी कीर्तिकिरण पूजार**

****

हिंगोली जिल्ह्याच्या वसमत तालुक्यात टेम्पो आणि दुचाकीच्या धडकेत दोघा दुचाकीस्वारांचा अपघाती मृत्यू झाला. किन्होळा फाट्याजवळ काल दुपारी ही दुर्घटना घडली.

****

अनुसूचित जमाती प्रवर्गाच्या सर्व रिक्त जागा त्वरित भरण्यासह इतर अनेक मागण्यांसाठी ऑल इंडिया स्टुडंट्स फेडरेशनच्या वतीनं काल छत्रपती संभाजीनगर इथं जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला. फेडरेशनचे राज्याध्यक्ष वैभव चोपकर यांच्या नेतृत्वातल्या शिष्टमंडळाने अप्पर जिल्हाधिकारी संभाजी अडकणे यांना मागण्यांचं निवेदन सादर केलं.

****

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातल्या सर्व न्यायालयांमध्ये मीडिएशन फॉर द नेशन या मोहिमेचं आयोजन करण्यात आलं आहे. ३० सप्टेंबरपर्यंत चालणाऱ्या या मोहिमेत नागरिकांनी आपली प्रलंबित प्रकरणं मध्यस्थी केंद्रांकडे पाठवून, तडजोडीने अथवा सामोपचारातून निकाली काढण्याचं आवाहन करण्यात आलं आहे.

****

जालना जिल्ह्यातल्या अंबड इथला ग्राम महसूल अधिकारी श्रीपाद देशपांडे याला चार हजार रुपये लाच घेताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागानं काल रंगेहाथ अटक केली. तक्रारदाराच्या प्लॉटची फेर नोंद घेण्यासह अन्य दाखले देण्यासाठी त्यानं ही लाच मागितली होती.

****

इंग्लंड दौऱ्यावर गेलेल्या भारतीय महिला क्रिकेट संघाच्या इंग्लंडविरूद्ध तीन एकदिवसीय क्रिकेट सामन्यांच्या मालिकेला आजपासून सुरुवात होत आहे. आजचा पहिला सामना साऊदॅम्टन इथं भारतीय प्रमाण वेळेनुसार सायंकाळी साडेपाच वाजता सुरू होईल.

****

हवामान

कोकण, मध्य महाराष्ट्र तसंच मुंबई शहर आणि उपनगरात आज दिवसभरात मुसळधार ते अतिमुसळधार पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे.

दरम्यान, छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातल्या जायकवाडी धरणाची पाणी पातळी सध्या ७७ टक्क्यांपर्यंत पोहोचली आहे.

****